मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (४१५७११)
"वाकवली विभाग"
ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र.मसंके/प्रअवा/७७० /२०२५.
1324

दिनांकः— 27 JUN 2025

# जाहिरात

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथे विद्यापीठ महसुली उत्पन्न योजनेतंर्गत (Revenue Receipts) निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात अकरा महिने कालावधीकरिता खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे JCB/ट्रॅक्टर चालक भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह पात्र उमेदवारांकडून दिनांक ११.०७.२०२५ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रति महिना (रू.) | नेमणुकीचा कालावधी | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १) | JCB/ट्रॅक्टर "वाहन चालक" | १ | ३०,०००/— | ११ महिने | विद्यापीठ महसुली उत्पन्न कंत्राटी कर्मचारी (Revenue Receipts) |

➢ पदासाठी पात्रता:—

| | |
|---|---|
| १. JCB/ट्रॅक्टर "वाहन चालक" | १) इयत्ता ०४ थी पास<br>२) JCB मशिन आणि कर्षित्र (ट्रॅक्टर) चालविण्याचा सक्षम प्राधिकारी याने दिलेला परवाना तसेच JCB मशिन आणि कर्षित्र (ट्रॅक्टर) चालविण्याचा किमान २ वर्षाचा अनुभव |

➢ अटी व शर्ती:—

१. वयोमर्यादा— खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४३ वर्षे राहील.

२. उमेदवाराने विहित प्रपत्रामध्ये पूर्ण तपशिल भरून अर्ज सादर करावा अर्जासोबत नमुना अ—स्वयंघोषणापत्र, प्रपत्र—ब स्वयं—साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना "अ" हे सर्व नमुने भरून पात्रतेची सर्व प्रमाणपत्रे, आधारकार्ड पॅनकार्ड बॅक पासबुक आदी सर्व कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती जोडून अर्ज सादर करावा अर्ज लखोटयावर मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, यांच्या नावाने व त्यांच्या कार्यालयात दिनांक ११.०७.२०२५ पुर्वी पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. अर्जाच्या लखोट्यावर JCB/ट्रॅक्टर चालक या पदासाठी अर्ज मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली "विद्यापीठ महसुली उत्पन्न" योजनेतंर्गत असे लिहिलेले असावे.

४. पात्र उमेदवारांची निवड समितीद्वारे मुलाखत व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतील.

(PTO)

Scanned with OKEN Scanner

५. मुलाखतीच्यावेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक.

६. मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवासभत्ता देय केला जा. नाही.

७. निवडलेल्या उमेदवाराने रू. १००/— किंमतीच्या स्टॅप पेपरवर नियुक्ती कालावधी दरम्यान तो नोकरी सोडणार नाही आणि नेमुन दिलेले काम पूर्ण करेल अणि तो नियमित नियुक्तीसाठी दावा करणार नाही, असे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

८. उमेदवाराला प्रकल्पातील नेमणुक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोलीच्या नियमित आस्थापनेवर नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

९. उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ सूचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

१०. उमेदवाराचा अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

११. निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१२. कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ०८.०० ते ०५.३० अशी राहील तथापि एखाद्या दिवसाचे काम वाढल्यास काम पूर्ण होईपर्यंत थांबावे लागेल किंवा काम पूर्ण करण्यासाठी लवकर यावे लागेल, कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१३. सुट्टीच्या दिवशी जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१४. काम समाधानकारक न वाटल्यास त्याच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचे अधिकार संबंधितांना राहतील.

१५. सदर तात्पुरती नियुक्ती ही अकरा महिने कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१६. JCB/ट्रॅक्टर चालक काम हे संबंधित नियंत्रक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार करावे लागेल.

१७. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार आपणास या नियुक्तीनंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१८. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणूक रद्द होऊ शकते.

१९. कोणत्याही टपाल विलंबासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२०. कोणत्याही स्वरूपात राजकारणात सहभाग आढळून आल्यास उमेदवाराला या पदासाठी अपात्र ठरविले जाईल.

२१. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना—अ मध्ये अर्जासोबत सादर करावे.

२२. वयाचा लाभ/फायदा उमेदवाराकडून नॉनक्रिमीलेअर/जातीचा दाखला घेणे आवश्यक राहील.

२३. नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२४. जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२५. प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकित असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक.

२६. अर्जावर उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा अलीकडील काळातील काढलेला फोटो चिकटवावा.

Scanned with OKEN Scanner

२७. JCB/ट्रॅक्टर चालक कर्मचाऱ्याला अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली स्वत:ची राहील, त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

२८. शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्याच्या देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

२९. JCB/ट्रॅक्टर चालक मशिन चालविणाऱ्या कर्मचाऱ्याने आपला स्वत:चा अपघाता विमा काढणे बंधनकारक आहे.

३०. विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.बासाकोकृवि/आस्था/ब—५/३३६६/२०२३, दि. २५/०८/२०२३, अन्वये सर्व अटी व शर्ती ठेकेदारास बंधनकारक आहेत.

**सोबत:—** १) अर्जाचा नमुना
२) प्रपत्र—अ स्वंघोषणापत्र
३) प्रपत्र—ब स्वय—साक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र
४) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना "अ"

ठिकाण :—वाकवली.
दिनांक :— 17 JUN 2025

**संचालक,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,**
**ता.दापोली, जि.रत्नागिरी.**

**प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी.....**

१. मा.आहरण व संवितरण अधिकारी, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता.दापोली यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या जाहीरातीस विद्यपीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.
२. ग्रामपंचायत कार्यालय, वाकवली, पांगारी, टेटवली, कुंभवे, सुखदर
३. सुचना फलक, संचालक, मध्यवती संशोधन केंद्र, वाकवली.
४. सुचना फलक, भा.सु.यो, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
५. सुचना फलक, कंदपिके संशोधन योजना मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

Scanned with OKEN Scanner